# चिपळूण नगर परिषद
## निवीदा सुचना

चिपळूण नगर परिषदेस खालील नमूद कामे करावयाची आहेत. सदर कामी खालील पैकी अ.क्र. **१ व २ करीता टक्केवारी पध्दतीने तर, अ.क्र. ३ व ४ करीता ठोक पध्दतीने** व दोन लखोटा पध्दतीने सिलबंद निवीदा मागविणेत येत आहेत.

**१. आर्कीटेक्ट पॅनल तयार करणे.**

| अ.क्र. | कामाचा तपशिल | कामाची मुदत | निवीदा फॉर्मची किंमत | अनामत रक्कम धनाकर्ष अथवा मुदत ठेवीची पावती चे स्वरुपात |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्पाचे जागेला भेट देऊन योजनेचा उद्देश, आवश्यकता, सौदर्यदृष्टी वगैरे विचारात घेऊन आराखडे व अंदाजपत्रके तयार करणे. | कामाचे आदेश दिल्या पासून ३० दिवस | १०००.०० | १०,०००.०० |
| २ | नकाशे मान्यता, तांत्रीक मान्यता आणि प्रशासकिय मान्यता प्राप्त करणे. | | | |
| ३ | कामावर दररोज देखरेख करणे, **(day to day supervision)** | | | |
| ४ | बीले नोंदविणे वगैरे सर्व अनुषंगीक कामे करणे. | | | |

**अटी व शर्ती**

१. आर्कीटेक्ट पॅनल तयार करणे.

* शासनाचे प्रचलीत नियम आणि बांधकाम नियमावली नुसार तपशिलवार बांधकाम नकाशे तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे, नकाशे व अंदाजपत्रकांना सक्षम प्राधिकारणाची नकाशे मान्यता, तांत्रीक मान्यता व प्रशासकिय मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे.
* प्राप्त निवीदां मधील सर्वात कमी दराचे निवीदे मध्ये नमूद टक्केवारी दरानुसार सर्व निवीदा धारक चिपळूण नगर परिषदेचे आर्कीटेक्ट पॅनल वर काम करणेस तयार असले बाबत विचारणा करणेत येईल व त्याप्रमाणे चिपळूण नगर परिषदेचे आर्कीटेक्ट पॅनल तयार केले जाईल.
* आर्कीटेक्ट, इंजिनियर आणि इलेक्ट्रीकल इंजिनियर अशा विविध श्रेणींमधील तज्ञांचे पॅनल तयार करणेत येईल व संबंधीत श्रेणी तज्ञांना मा. कौन्सील सभेचे मान्यतेने कामे देणेत येतील.
* कामाची फि खालील प्रकारे अदा करणेत येईल.
  १. डिझाईन सर्व्हीसेसच्या पुर्तते उपरांत ४० टक्के
  २. सुपरव्हिजन व क्वॉलिटी कन्ट्रोल सर्व्हीसेस पुर्तते उपरांत ४० टक्के
  ३. मेजरमेंट व बिलींग सर्व्हीसेस उपरांत २० टक्के
* कामाच्या ठिकाणी आवश्यकत्या नोंदवहया ठेवणे व तपासणी आवश्यक वेळोवेळी सादर करणे आवश्यक आहे.
* कामाच्या ठिकाणी काम सुरु असतांना दैनंदिन पर्यवेक्षण करणे आवश्यक आहे.
* नगर पालिके मार्फत ज्या वेळेस आमंत्रीत केले जाईल त्या वेळेस उपस्थीत राहणे बंधनकारक असेल.
* कामामध्ये दिरंगाई व हलगर्जीपणा केल्यास नगर पालिकेमार्फत निश्चीत केलेल्या दरा नुसार दंड भरणे बंधनकारक असेल.
* प्रकल्पाचे नकाशे नगर पालिकेचे पुर्णपणे समाधान होईल त्या प्रमाणे तयार करुन देणे.
* काम जसजसे पुर्ण होईल त्यानुसार मक्तेदारांची बीले तयार करुन व तपासून देणेत येतील तसेच काम योग्य दर्जानुसार पुर्ण झाल्या बाबतचे प्रमाणपत्र देणेत येईल.
* काम सुरु असतांना काही बदल नगर परिषेदेने सुचविल्यास त्या प्रमाणे त्या बदला नुसार आवश्यकते आराखडे व नकाशे तयार करुन आवश्यक मंजुरी घेऊन देणेची आहे.

**२. चिपळूण नगर पालिका हद्दीमध्ये एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेची अंमलबजावणी करणे.**

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | **कामाची मुदत** | **निवीदा फॉर्मची किंमत** | **अनामत रक्कम धनाकर्ष अथवा मुदत ठेवीची पावती चे स्वरुपात** |
|---|---|---|---|---|
| १ | चिपळूण नगर पालिका हद्दीमधील बेघर लोकांसाठी केंद्र शासन पुरस्कृत एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेची अंमलबजावणी करणे कामी सामाजीक व आर्थीक पहाणी करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, व सी.डी.पी. (**C**ity **D**evelopment **P**lan) तयार करणे. | ६० दिवस | १०००.०० | १०,०००.०० |

**अटी व शर्ती**

१. केंद्र शासनाचे एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेचे निकषांनुसार शहराची सामाजीक व आर्थिक पहाणी करणे, प्रकल्प अहवाल आणि सी.डी.पी. (**C**ity **D**evelopment **P**lan) तयार करणे, त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे, सादरीकरण करणे , भेटी देणे व प्रकल्पास अंतीम मान्यता झालेनंतर प्रत्यक्ष प्रकल्पाचे कामावर देखरेख ठेवणे, बीले तयार करणे व उपरोक्त आर्कीटेक्ट पॅनल तयार करणे कामी निश्चीत केलेल्या मानकां नुसार व अटी शर्तीनुसार काम करणे.

**३. सुधारीत बांधकाम नियमावली तयार करणे.**

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | **कामाची मुदत** | **निवीदा फॉर्मची किंमत** | **अनामत रक्कम धनाकर्ष अथवा मुदत ठेवीची पावती चे स्वरुपात** |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य शासन आणि केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सुधारणा व निर्देशांचा सुधारीत बांधकाम नियमावलीमध्ये समावेश करुन चिपळूण नगर परिषदेची सुधारीत बांधकाम नियमावली तयार करणे. | ६० दिवस | १०००.०० | १०,०००.०० |
| २ | चिपळूण शहराचे विकास आणि विस्ताराचे दृष्टीने आवश्यक असलेल्या सुधारणांचा समावेश सुधारीत बांधकाम नियमावलीमध्ये अंतर्भाव करणे. | | | |
| ३ | बांधकाम नियमावलीस नगर रचना विभाग तसेच राज्य शासनाची मान्यता घेणे. | | | |
| ४ | सुधारीत बांधकाम नियमावलीस मान्यता होणेसाठी आवश्यक सर्व माहीती तयार करणे, रत्नागिरी, मुंबई पुणे वगैरे ठिकाणी संबंधीत शासकिय कार्यालयांना भेटी देऊन माहीती देणे, पुर्तता करणे सादरी करण करणे आणि तदनुषंगीक सर्व कामे करणे | | | |

**अटी व शर्ती**

राज्य शासन आणि केंद्र शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या सर्व सुचना, परिपत्रकांचा समावेश करुन तसेच चिपळूण शहराच्या वाढत्या गरजा , विस्तार आणि भौगोलीक परिस्थीती यांचा विचार करुन व सध्या वापरात असलेली बांधकाम नियमावली विचारात घेऊन चिपळूण नगर परिषदेची आदर्श बांधकाम नियमावली तयार करणे, त्यास शासनाची मान्यता घेणे, यासाठी आवश्यक ती माहीती संकलीत करणे, सादरी करण करणे, भेटी देणे वगैरे सर्व कामे करणे आवश्यक आहे.

## १. चिपळूण नगर परिषदेचा सी.डी.पी. (City Development Plan) तयार करणे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | कामाची मुदत | निवीदा फॉर्मची किंमत | अनामत रक्कम धनाकर्ष अथवा मुदत ठेवीची पावती चे स्वरुपात |
|---|---|---|---|---|
| १ | केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांसाठी आवश्यक असलेला शहर विकास आराखडा (सी.डी.पी. - **C**ity **D**evelopment **P**lan) तयार करणे. | ६० दिवस | १०००.०० | १०,०००.०० |

अटी व शर्ती

१. केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांसाठी आवश्यक असलेला शहर विकास आराखडा (सी.डी.पी. - **C**ity **D**evelopment **P**lan) तयार करणे यासाठी शहराची पहाणी करणे, नकाशे तयार करणे / उपलब्ध करणे, विविध ठिकाणी व शासकिय कार्यालयांना भेटी देणे ,सादरी करण करणे वगैरे सर्व कामे करणे.

**अ.क्र. १ व २ करीता टक्केवारी पध्दतीने दर नमूद करावेत. तर अ.क्र. ३ व ४ करीता ठोक पध्दतीने दर नमूद करावेत.**

१. निवीदा फॉर्म मिळण्याची शेवटची तारीख :- ०४/०५/२०१० वेळ सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत नगर परिषदेचे अभिलेख व भांडार विभागात मिळू शकतील.

२. निवीदा पूर्व बैठक :- ०३/०५/२०१० वेळ सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत

३. निवीदा सादर करण्याची अंतीम तारीख :- ०५/०५/२०१० वेळ सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत प्रशासकिय अधिकारी चिपळूण नगर परिषद यांचे कक्षामध्ये ठेवलेल्या टेंडर पेटीमध्ये टाकावयाची आहे.

चिपळूण नगर परिषद कार्यालयामध्ये उपस्थीत निवीदा धारक यांचे समक्ष उघडणेत येतील. उशीरा आलेल्या, पोष्टाने/कुरीयरने आलेल्या निवीदा स्विकारणेत येणार नाहीत. कामा संबंधी माहीती नगर परिषद बांधकाम विभागात कार्यालयीन कामाकाजाचे वेळेत कामकाजाचे दिवशी मिळू शकेल. सव्वीस्तर निवीदा सुचना नगर परिषद कार्यालयामधील सुचना फलकावर पहावयास मिळेल अथवा नगर परिषदेच्या अभिलेख व भांडार विभागात मागणी केल्यास विनामूल्य उपलब्ध होऊ शकेल. कोणतीही एक अथवा सर्व निवीदा स्विकृत अथवा अस्विकृत करणेचे अंतीम अधिकार मुख्याधिकारी चिपळूण यांनी राखून ठेवले आहेत. निवीदा नगर परिषदेचे वेबसाईट www.cmcchiplun.org वर उपलब्ध आहे.

**निवीदा लखोटा क्रमाक १ मध्ये ठेवावाचे कागदपत्र (तांत्रीक बोलीचा लिफाफा)**

१. अनुभवाचे दाखले
२. संस्थेची व संस्थेमध्ये काम करणारे तज्ञ व्यक्तींची माहीती (कंपनी प्रोफाईल)
३. अनामत रकमेचा धनाकर्ष अथवा मुदत ठेवीची पावती
४. अन्य काही माहीती / कागदपत्र जोडावयाची असल्यास

**निवीदा लखोटा क्रमाक २ मध्ये ठेवावाचे कागदपत्र**

२. निवीदा दरपत्रक

वरील कामे व त्या संबंधीचे ठरावाचे अनुषंगाने अटी व शर्ती निवीदा धारकाची पात्रता निश्चीत करणे आवश्यक आहे.

सही /-

**(गणेश शेटे)**
मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद

सही /-

**(अजमल पटेल)**
नगराध्यक्ष
चिपळूण नगर परिषद